# भुयारी मेट्रो टप्प्यात

## कुलाबा ते सीप्झ मार्गिकेच्या कामाला वेग

म. टा. प्रतिनिधी

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ या संपूर्ण भुयारी मार्गिकेचा पहिला टप्पा जानेवारी, २०२४मध्ये सुरू होणार आहे. त्यादृष्टीने मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) कामांना वेग दिला आहे. सद्यस्थितीत पहिल्या टप्प्यातील ९५.८ टक्के स्थापत्य कामे पूर्ण झाली आहेत. तर पहिल्या टप्प्यातील मार्गिकेवरील स्थानकांची ८७.९ टक्के स्थापत्य कामे पूर्ण होऊन पुढील कामे पूर्ण करून चाचण्या केल्या जातील.

एमएमआरसीच्या आधीच्या नियोजनानुसार मेट्रो ३चा पहिला टप्पा डिसेंबर २०२१मध्ये सुरू केला जाणार होता. मात्र विविध कारणांनी हा प्रकल्प रखडला आहे. आता मेट्रो ३चा आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबर २०२३पर्यंत, तर दुसरा टप्पा जून २०२४पर्यंत सुरू केला जाणार आहे. त्यासाठी पहिल्या टप्प्यातील कामे जून २०२३पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन एमएमआरसीने केले आहे.

**पहिल्या टप्प्यातील स्थानकांची कामे**

| | |
|---|---|
| सिप्झ | ९३.९२ टक्के |
| एमआयडीसी | ९४.१० टक्के |
| मरोळ नाका | ९०.९२ टक्के |
| आंतरराष्ट्रीय विमानतळ | ८६.९४ टक्के |
| सहार रोड | ८७.२० टक्के |
| देशांतर्गत विमानतळ | ८६.८४ टक्के |
| सांताक्रूझ | ८३.५६ टक्के |
| विद्यानगरी | ८५.२५ टक्के |
| बीकेसी | ८२.७३ टक्के |



### आरे ते बीकेसी

आरे ते बीकेसी मेट्रोच्या पहिल्या टप्प्याच्या कामांनाही वेगाने सुरुवात झाली आहे. या पहिल्या टप्प्याचे एकूण ७६.४ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यातील स्थापत्य कामे ९५.८ टक्के, स्थानकांची स्थापत्य कामे ८७.९ टक्के, यंत्रणेची कामे ४२.५ टक्के, रुळांची कामे ४२.२ टक्के, ओव्हरहेड पॉवर सप्लाय यंत्रणेचे ३६.४ टक्के काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती 'एमएमआरसी'ने दिली.

### प्रकल्पाची सद्यस्थिती

पहिला टप्पा डिसेंबर २०२३पर्यंत सुरू करण्यात येणार असल्याने कामे जलदगतीने पूर्ण करण्यावर 'एमएमआरसी'ने भर दिला आहे.

- ३३.५ किमी लांबीच्या मेट्रो मार्गिकेचे ७४.५ टक्के काम पूर्ण.
- भुयारीकरणाचे काम ९८.७ टक्के.
- स्थापत्य कामे ८६ टक्के.
- स्थानकांची स्थापत्य कामे ८४.५ टक्के.
- यंत्रणेची कामे ३९.६ टक्के.
- रुळांची कामे ३४.३ टक्के पूर्णत्वास.